# सामान्य स्थायी आदेश क्रमांक ९३ सन २०१४.

**विषय : १) भांडवली सामान खरेदीच्या यादीमध्ये सुधारणा करणेबाबत.**
**२) भांडवली सामान खरेदीच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करणेबाबत.**
**संदर्भ : सामान्य स्थायी आदेश १२०९ सन २०११, दिनांक १७.०९.२०११.**

---

भांडवली सामान खरेदीसंदर्भात सामान्य स्थायी आदेश १२०९/२०११ प्रसारीत करण्यात आला आहे. सदर सामान्य स्थायी आदेशामधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यास संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्रमांक २०१४:०२:१०, दिनांक २८.०२.२०१४ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सामान्य स्थायी आदेश १२०९/२०११ मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

(२) जोडपत्र 'ड' मध्ये नमूद केलेल्या कार्यालयीन वापरासाठी आवश्यक असणा-या उपकरणांच्या यादीमध्ये सर्व्हर, राऊटर, स्वीच, हब, मॉडेम, संगणकाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य, आज्ञावली इत्यादी साधनसामग्री यादीमध्ये समाविष्ट करण्यास मंजूरी देण्यात आली. तसेच, जोडपत्र 'ड' मधील बाबी राज्य लघुउद्योग विकास महामंडळ तसेच डीआयटी (DIT), डीजीएस अँन्ड डी. (DGS&D), सीएसपीओ (CSPO), एनआयसीएसआय (NICSI) इत्यादी सरकारमान्य संस्थांमार्फत निर्गमित केलेल्या दर करारानुसार खरेदी करण्यात यावेत. तसेच, आवश्यक असलेल्या साहित्याचे दरकरार उपलब्ध नसतील तर विहित कार्यपध्दती अवलंबून खरेदी करण्यास मंजूरी दिली.

(अ) संगणक व अनुषंगिक यंत्रसामग्रीचे विनिर्देश (Configuration) उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) ठरवतील.

(ब) संगणक प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी व त्याकरीता सरकार मान्य संस्थांचे दर करार विचारात घेऊन दर करारावर खरेदी करावयाचे किंवा निविदा मागवून खरेदी करावयाची याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ, मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या समितीस प्रदान करण्यात आले.

(क) वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजनाव्दारे, ₹ १,००,०००/- (रुपये एक लाख ) पर्यंत प्रशासकीय मंजूरीचे व वस्तू खरेदी करण्याचे अधिकार वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना देण्यात आले.

याव्यतिरिक्त सामान्य स्थायी आदेश १२०९ सन २०११ मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

रवींद्र धोंगडे

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ,**
**रा.प.महामंडळ.**

क्रमांक राप/कर्मवर्ग/साप्र/ 2212
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई ४०० ००८.
दिनांक : ९ मे, २०१४.